दै प्रजावाणी

# आक्षेपांवर सुनावणीसाठी शुक्रवारचा मुहूर्त!



■ मनपा प्रभाग रचना व आरक्षण हरकती

■ 'मजिप्रा'चे सदस्य सचिव संतोषकुमार यांची नियुक्ती

नांदेड,दि.२४: महापालिकेच्या प्रारुप प्रभाग रचना व आरक्षणावर येत्या शुक्रवारी (दि.२८) सुनावणी घेतली जाणार आहे. मनपाच्या स्थायी समिती सभागृहात सकाळी १०.३० पासून सुनावणीची प्रक्रिया सुरु होईल. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव संतोषकुमार हे राज्य निवडणूक आयोगाचे प्राधिकृत अधिकारी म्हणून सुनावणीची प्रक्रिया पूर्ण करणार आहेत.

गेल्या दि. ६ जुलै रोजी मनपा सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारूप प्रभाग रचना जाहीर करून आरक्षणाची सोडत काढण्यात आली. परंतु, या सोडतीमध्ये ओबीसी महिलांचे आरक्षण चुकल्यामुळे १० जुलै रोजी फेरसोडत काढण्यात आली. या दोन्ही सोडती, तसेच प्रभाग रचनेच्या बाबतीत ११ ते १९ जुलै या कालावधीत नागरिकांच्या हरकती व सूचना मागविण्यात आल्या. प्रभाग रचनेवर ८० आणि आरक्षण सोडतीवर दोन जणांनी आपले आक्षेप दाखल केले होते.

विभागीय आयुक्त हे महापालिकेच्या प्रभाग रचना समितीचे अध्यक्ष असल्याने आक्षेपांवर सुनावणीसाठी मराठवाड्याबाहेरील सनदी अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याचा विचार राज्य निवडणूक आयोगाकडून सुरू होता. आयोगाने या कामासाठी मंत्रालयात कार्यरत असलेले महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव संतोषकुमार या सनदी अधिकाऱ्याची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे.

संतोषकुमार हे २८ जुलै (शुक्रवारी) मनपाच्या स्थायी समिती सभागृहात सकाळी १०.३० पासून सुनावणीची प्रक्रिया सुरू करतील. एकाच स्वरुपाचे, एकाच मुद्द्यावर आक्षेप असलेल्या लोकांना एकत्र बोलवून त्यांच्या आक्षेपाचे निराकरण केले जाण्याची शक्यता सूत्रांकडून व्यक्त करण्यात आली. सुनावणी पूर्ण केल्यानंतर संतोषकुमार यांना सुनावणीवर निर्णयाचा मसुदा राज्य निवडणूक आयोगाकडे सादर करण्यासाठी ५ ऑगस्ट ही अंतिम तारीख असून, आयोगाकडून सुनावणी ■ पान २ वर

## आक्षेपांवर सुनावणीसाठी ...

निर्णय जारी करण्यासाठी १० ऑगस्ट अशी तारीख निर्धारित करण्यात आली आहे. १४ ऑगस्ट २०१७ रोजी किंवा त्यापूर्वी राज्य निवडणूक आयोगाकडून मनपाच्या प्रभाग रचना अंतिम प्रसिद्धी व आरक्षण सोडतीची महिती शासन राजपत्राद्वारे प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यानंतरच निवडणुकीच्या रणधुमाळीला खऱ्या अर्थाने सुरुवात होणार आहे.

दै. लोकमत

# प्रभाग रचनेच्या आक्षेपावर २८ रोजी सुनावणी

नांदेड : महापालिकेच्या प्रभागा रचनेच्या आक्षेपावर सुनातणीसाठी राज्य निवडणूक आयोगाकडून २८ जुलै २०१७ रोजी सुनावणी करण्याचे आदेश मनपाला प्राप्त झाले आहेत. या आक्षेपाच्या सुनावणीसाठी राज्य निवडणूक आयोगाकडून मराठवाड्याबाहेरील सनदी अधिकाऱ्यांची नियुक्ती होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. मंत्रालयातील सचिव दर्जाचा अधिकारी नियुक्त करण्याचा विचार आयोगाचा असून २०१२ साली झालेल्या महापालिका निवडणुकीतील प्रभागरचना मनपा आयुक्तांनी तयार करून त्यास राज्य निवडणूक आयोगाची मान्यता घेण्यात आली होती. परंतु आगामी निवडणुकीसाठी ही जबाबदारी आयोगाने संबंधित मनपा आयुक्तांच्या समितीकडे सोपवली आहे. ८० आरक्षण सोडतीबाबत ८२ आक्षेप दाखल झाले आहेत.

25.07.17